नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

प्रेस नोट

दिनांक २६/०४/२०२२ (मंगळवार)

(सायंकाळ)

कुवारा भिवसेन येथील दारू अड्डयावर धाड
—: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण ची कारवाई :—

दिनांक २५/०४/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रामटेक उपविभागात गस्त करीत असतांना पोलीस स्टेशन पारशिवनी हद्दीतील मौजा कुवारा भिवसेन यात्रे दरम्यान अमित भलावी नावाचा इसम हा त्याचे घरासमोर अवैधरित्या बिनापरवाना देशी दारू बाळगुन विक्री करीत असल्याची गोपनिय माहीती पथकास प्राप्त झाले वरून सदर पथकाने सापळा रचुन छापा टाकला असता अमित शंकर भलावी, वय २५ वर्ष, रा. कुवारा भिवसेन याचे ताब्यात एकुण १२१ नग देशी दारूच्या सिलबंद निपा, एकुण किं. ९,६८०/—रू चा माल अवैधरित्या बिनापरवाना मिळुन आल्याने सदर माल त्याचे ताब्यातुन जप्त करून आरोपीं विरूध्द अप.क्र. १४६/२०२२ कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपीस जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे पारशिवनी यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास पोलीस ठाणे पारशिवनी करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, नापोशि विपीन गायधने, अमोल वाघ, रोहन डाखोरे, चालक अमोल कुथे यांचे पथकाने केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर